# लोकमंगल संस्थेच्या रौप्यमहोत्सवी लोकमंगल कॉलेजेस मध्ये माजी विद्यार्थी स्नेह मेळावा २०२३ २५ वर्षांनी माजी विद्यार्थी रमले आठवणीत

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल कॉलेजेस् वडाळा येथे माजी विदयार्थी मेळावा २०२३ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.देशांत, विविध राज्यांत नोकरीसह उद्योग क्षेत्रात रमलेले विद्यार्थी तब्बल पंचवीस वर्षांनंतर एकत्र आले. आठवणींना उजाळा देत महाविद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांच्या फीसाठी आर्थिक मदत देऊन सामाजिक बांधिलकीही जोपासली. कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा दिनांक २९ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता पार पडला कार्यक्रमाच्या प्रमूख अतिथी म्हणुन सोलापूर जिल्ह्याच्या असिस्टंट कलेक्टर माननीय मनीषा आव्हाळे मॅडम आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लोकमंगल संस्थेचे व समूहाचे संस्थापक व अध्यक्ष माननीय आमदार श्री सुभाष (बापू) देशमुख हे व्यासपीठावर उपस्थित होते तसेच लोकमंगल कॉलेजेस च्या सचिव माननीय डॉ.अनिता डोबळे मॅडम, डॉ. एस.डी. देवकर सर, डॉ. किरण जगताप सर,डॉ. सचिन फुगे सर,डॉ. अमोल शिंदे सर , प्रा. नवनाथ गोसावी सर , प्रा. योगेश गायकवाड सर याची व्यासपीठावर उपस्थिती होती. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी महाराष्ट्र पोलीस दलाच्या API माननीय द्वारका गायकवाड मॅडम , प्रसिद्ध उद्योजक माननीय श्री श्रीकांत कोठावले, भारतीय रेल्वे दलाचे अधिकारी माननीय श्री शोएब शेख , लोकमंगल आय.टी.आय.चे माजी विद्यार्थी समर्थ भोसले,मुयुरेश जमदार यांच्याबरोबर सुमारे तीनशे माजी विद्यार्थ्यांची कार्यक्रम स्थळी सस्नेह उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रस्तावना व पाहुण्यांची ओळख करून देताना माननीय डॉ. अमोल शिंदे सर यांनी ॲल्युमिनि असोसिएशनच्या स्थापनेबद्दलची मार्गदर्शक तत्वे , उद्दिष्टे तसेच ध्येय व जबाबदारी याबद्दल व्याख्यान दिले .कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा. मनीषा अव्हाळे मॅडम यांनी मेळाव्यातील उपस्थितांना संबोधित केले कॉलेज मध्ये आपण जे शिकलो ते समाजापर्यंत पोहचवण्यासाठी आपण मेहनत घेतली पाहिजे असं मत त्यांनी मांडले. कार्यक्रमाचे माननीय अध्यक्ष श्री सुभाष बापूंनी आपल्या भाषणात गरीब, मेहनती आणि होतकरू

तरुणांना उद्योग क्षेत्रात पुढे आणण्यासाठी १० लाख रुपये अर्थसहाय्य करण्याची घोषणा केली तसेच सुशिक्षित तरुणांना नोकरीच्या माघे न धावता स्वतःचा उद्योग थाटण्याचे आवाहन केले . माननीय सुभाष बापूंनी असंख्य होतकरू तरुणांना उद्योग व्यवसाय उभा करण्यासाठी आर्थिक मदत केलेली आहे त्यापैकी माजी विद्यार्थी उद्योजक माननीय श्री श्रीकांत कोठावले यांनी त्यांच्या उद्योजकतेच्या यशस्वी प्रवासाबद्दलच्या आठवणींना उजाळा दिला , रुपये ५००० पासून सुरू केलेला उद्योग आज ८० कोटीची उलाढाल करणारा व्यवसाय कसा बनला याबद्दलची यशोगाथा सांगितली. लोकमंगल कॉलेजच्या सचिव डॉ.अनिता ढोबळे मॅडम यांनी आजी व माजी विद्यार्थ्यांना संबोधित करताना यूपीएससी परीक्षे मधून आय ए एस मध्ये यश संपादन करणाऱ्या आजी-माजी विद्यार्थ्यांसाठी रुपये एक लाख प्रोत्साहन पर बक्षीस जाहीर केले

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. किरण जगताप सर यांनी केले. ॲल्युमिनि असोसिएशनचे प्रमुख अधिकारी अधिकारी म्हणून माननीय श्री संतोष कुलकर्णी सर यांनी विशेष सहाय्य केले.






आयोजित
माजी विद्यार्थी मेळावा
२०२३
रविवार दि. २९ जाने. २०२३


लोकमंगल कॉलेजेस्
आयोजित
माजी विद्यार्थी
२०२३

दैनिक
जनसत्य
नि:पक्ष नजर...,नि:पक्ष खबर...

# लोकमंगल कॉलेजेसमध्ये माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

## २५ वर्षांनी माजी विद्यार्थी रमले आठवणीत



जनसत्य, प्रतिनिधी

**सोलापूर :** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल कॉलेजेस् वडाळा येथे माजी विदयार्थी मेळावा २०२३ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.देशांत, विविध राज्यांत नोकरीसह उद्योग क्षेत्रात रमलेले विद्यार्थी तब्बल पंचवीस वर्षांनंतर एकत्र आले. आठवणींना उजाळा देत महाविद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांच्या फीसाठी आर्थिक मदत देऊन सामाजिक बांधिलकीही जोपासली. कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा दिनांक २९ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता पार पडला कार्यक्रमाच्या प्रमूख अतिथी म्हणुन सोलापूर जिल्ह्याच्या असिस्टंट कलेक्टर माननीय मनीषा आव्हाळे मॅडम आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणन लोकमंगल संस्थेचे व समूहाचे संस्थापक व अध्यक्ष माननीय आमदार सुभाष देशमुख हे व्यासपीठावर उपस्थित होते तसेच लोकमंगल कॉलेजेस च्या सचिव माननीय डॉ.अनिता डोबळे मॅडम, डॉ. एस.डी. देवकर सर, डॉ. किरण जगताप सर,डॉ. सचिन फुगे सर,डॉ. अमोल शिंदे सर , प्रा. नवनाथ गोसावी सर , प्रा. योगेश गायकवाड सर याची व्यासपीठावर उपस्थिती होती. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी महाराष्ट्र पोलीस दलाच्या झख माननीय द्वारका गायकवाड , प्रसिद्ध उद्योजक माननीय श्री श्रीकांत कोठावले, भारतीय रेल्वे दलाचे अधिकारी माननीय श्री शोएब शेख , लोकमंगल आय.टी.आय.चे माजी विद्यार्थी समर्थ भोसले,मुयुरेश जम दार यांच्याबरोबर सुमारे तीनशे माजी विद्यार्थ्यांची कार्यक्रम स्थळी सस्नेह उपस्थिती होती. सुभाष बापूंनी असंख्य होतकरू तरुणांना उद्योग व्यवसाय उभा करण्यासाठी आर्थिक मदत केलेली आहे त्यापैकी माजी विद्यार्थी उद्योजक श्रीकांत कोठावले यांनी त्यांच्या उद्योजकतेच्या यशस्वी प्रवासाबद्दलच्या आठवणींना उजाळा दिला , रुपये ५००० पासून सुरू केलेला उद्योग आज ८० कोटीची उलाढाल करणारा व्यवसाय कसा बनला याबद्दलची यशोगाथा सांगितली.

लोकमंगल कॉलेजच्या सचिव डॉ.अनिता ढोबळे मॅडम यांनी आजी व माजी विद्यार्थ्यांना संबोधित करताना यूपीएससी परीक्षे मधून आय ए एस मध्ये यश संपादन करणाऱ्या आजी-माजी विद्यार्थ्यांसाठी रुपये एक लाख प्रोत्साहन पर बक्षीस जाहीर केले

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. किरण जगताप यांनी केले. ल्युमिनि असोसिएशनचे प्रमुख अधिकारी अधिकारी म्हणून माननीय संतोष कुलकर्णी यांनी सहाय्य केले.

Main Edition
Feb 2, 2023 Page No. 7
Powered by : eReleGo.com